l of Research & Development
Issue 03), June-July, 2017
2230-9578)


# नाशिक जिल्ह्यातील अदिवासी लोकसंख्याः एक स्थल-कालिक अध्ययन

डॉ. खान ए. आय.
भूगोल विभाग
शासकीय महाविद्यालय, औरंगाबाद

**प्रस्तावनाः**

लोकसंख्येच्या अभ्यासात लोकसंख्येचे आकार, वितरण, संरचना या प्रमुख विषयांचा अभ्यास होतो. लोकसंख्येच्या विविध वैशिष्ट्यांपैकी लोकसंख्येची घनता, लोकसंख्या वाढ,जन्म, मृत्यूप्रमाण, स्थलांतर, लोकसंख्या व साधनसंपत्ती या सर्वांचा भौगोलिक परिस्थितींशी संबंध आहे. तसेच या विषयांचे अध्ययन आकडेवारीवर आधारित आहे. शिवाय यातील विषय एकमेकाशी निगडित आहेत. त्यामुळे लोकसंख्येचा अभ्यास वेगवेगळ्या प्रकारे होतो. म्हणून लोकसंख्या भूगोलाचे विविधांगी स्वरुप दिसून येते. लोकसंख्या भूगोलाचे मुख्य स्वरुप म्हणून संख्यात्मक स्वरुपाकडे बघता येईल. कारण लोकसंख्येचे अध्ययन म्हणजे आकडेवारीचे अध्ययन होय. या अध्ययनात लोकसंख्येचे वितरण, घनता, जन्म-मृत्यू दर, व्यवसाय, साक्षरता, वैवाहिक स्थिती, स्थलांतर व इतर आकडेवारीला महत्व आहे. म्हणूनच आधुनिक भूगोलाचे स्वरुप संख्यात्मक दिसून येते. याउलट लोकसंख्या भूगोल म्हटले की, भौगोलिक परिस्थितीच्या अनुषंगाने लोकसंख्येचे अध्ययन होतांना दिसते. भूरचना, हवामान, जमीन व इतर साधनसंपत्ती मानवी लोकसंख्येवर परिणाम करते.

**नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्याः**

नंदुरबार जिल्हा २०°५०' ते २२°१७' उत्तर अक्षांश व ७३°३०' ते ७४°५०' पूर्व रेखांश या दरम्यान विस्तारलेला आहे.नंदुरबार जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ हे ५९५५ चौ. कि. मी. असून महाराष्ट्र राज्याशी याचे प्रमाण १.६२ टक्के आहे. इ.स. २०११ च्या जनगणनेनूसार नंदुरबार या जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १६४८२५० होती. एकूण लोकसंख्येपैकी १६.७१% टक्के लोकसंख्या ही शहरी भागात राहते तर ग्रामीण भागात ८३.२९% लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहते. नंदुरबार जिल्ह्यात सर्वाधिक लोकसंख्या घनता ही २७७ व्यक्ती प्रति चौ. किमी. एवढे आढळते. नंदुरबार जिल्ह्याचे २०११ च्या जनगणनेनूसार एकूण लिंगगूणोत्तर दर हजार पुरूषामागे ९७८ स्त्रीया एवढे आहे. त्यापैकी ग्रामीण भागातील लिंगगूणोत्तर दर हजार पुरूषामागे ९९६ स्त्रीया एवढे आहे. तर शहरी भागातील लिंगगूणोत्तर दर हजार पुरूषामागे ८९३ स्त्रिया एवढे आहे. जिल्ह्यातील साक्षरता प्रमाण हे ६४.६८% आहे.

**नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्येचे स्थल-कालिक विश्लेषणः**

जनगणना २०११ नुसार नाशिक जिल्ह्याची लोकसंख्या खालील तक्ता क्र.१ मध्ये दर्शविली आहे.

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.

तक्ता क्र. १

**नाशिक जिल्ह्याची लोकसंख्या (जनगणना 2011)**

| अ. न. | तालुके | लोकसंख्या |
|---|---|---|
| १ | नाशिक | १७५६५०२ |
| २ | पेठ | ११९८१९ |
| ३ | दिंडोरी | ३१५७२८ |
| ४ | सुरगाणा | १७६०३० |
| ५ | कळवण | २०८४२२ |
| ६ | सटाणा | ३७४९८९ |
| ७ | मालेगाव | ९५५७६४ |
| ८ | चांदवड | २३५४०३ |
| ९ | नांदगाव | २८८७२३ |
| १० | येवला | २७१३०० |
| ११ | निफ़ाड | ४९३६६६ |
| १२ | सिन्नर | ३४५५५६ |
| १३ | इगतपुरी | २५३५७९ |
| १४ | त्र्यंबकेश्वर | १६८५८२ |
| १५ | देवळा | १४४९८९ |
| | एकूण | ६१०९०५२ |

स्त्रोत - नाशिक जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ - २०११


तक्ता क्र. १ मध्ये लोकसंख्येची स्थिती तालुकानिहाय दर्शविली आहे. या सांख्यिकीय अवलोकनावरून असे दिसते की, सर्वच तालुक्यात लोकसंख्या समान पध्दतीने वितरित झालेली दिसत नाही. कारण प्रत्येक तालुक्यात असलेल्या सुविधा, व्यवसायाच्या संधी ह्या भिन्न-भिन्न असल्याने वितरणात विषमता असलेली दिसते. सर्वात जास्त लोकसंख्या नाशिक या तालुक्यात असून ती लोकसंख्या १७५६५०२ इतकी आहे. कारण ह्या तालुक्यात वेगवेगळे उद्योगधंदे त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याने राज्यातून व परराज्यांतून लोक येत असल्याने नागरिकरण वेगाने होऊ न लोकसंख्या वाध्त आहे. या तालुक्यानंतर मालेगावची लोकसंख्या जास्त असल्याची दिसते. कारण येथेही अनेक लहान मोठे उद्योग असल्याने लोक सभोवतालच्या खेडयातून व इतर तालुक्यातून स्थलांतर करतात. निफाड हा तालुका कृषी क्षेत्रात एक अग्रेसर तालुका म्हणून त्याचे नाव आहे. अशा या तालुक्याची लोकसंख्या ४९३६६६ इतकी आहे. या तालुक्यात लोक शेती व मजुरीसाठी येथे स्थलांतर करतात. चांदवड, येवला, नांदगाव व सिन्नर या तालुक्यात लोकसंख्येचे वितरण तुलनेने कमी असल्याचे दिसते, कारण या तालुक्यात पर्जन्यमान कमी त्यामुळे वर्षभर शेतीला पाणी पुरवठा होत नाही. उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होत असल्याने, शेतीव्यवसाय बंद पडतात. शिवाय ही स्थिती चक्राकार पध्दतीने सुरूच असते. म्हणून या भागातून लोक व्यवसायाच्या निमित्ताने शहरी भागाकडे स्थलांतर करत असल्याने याचा परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर झाले्ला आहे. तसेच पेठ, सुरगाणा, देवळा व इगतपुरी या तालुक्याची लोकसंख्या कमी असल्याचे दिसते.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Govt. College of Arts & Science Aurangabad

Asst. Prof.
M.E.S.Class-I
Govt.College of Art's
Science A'bad.

नाशिक जिल्ह्याची लोकसंख्या (२०११)




नकाशा क्र.१

कारण हा भाग मागासलेला वाहतूक सविधांचा अभाव त्यामुळे मागासलेपणा त्यामुळे लोकसंख्या मर्यादीत राहण्यासाठी मदत झालेली आहे. तसेच या भागातून लोक मजुरीसाठी हंगामी स्थलांतर करत असून त्यामुळेही लोकसंख्येच्या वितरणावर मर्यादा पडतात. नाशिक जिल्ह्याची लोकसंख्येची स्थिती लक्षात येण्यासाठी तालुक्यानुसार लोकसंख्येच्या वितरणाचे विश्लेषण केलेले आहे. लोकसंख्येची सर्वसामान्य स्थिती लक्षात येण्यासाठी प्रमाणबध्द वर्तुळ पध्दत वापरून तिचे वितरण दर्शविलेले आहे. यासाठी पुढील सूत्राचा वापर केलेला आहे.

$$\text{वर्तुळाची त्रिज्या} = \text{मानलेली त्रिज्या} \sqrt{\frac{\text{दिलेली संख्या}}{\text{मानलेली संख्या}}}$$

वरील सुत्राच्या आधारे तालुकानिहाय वर्तुळाच्या त्रिजेचे मापन करण्यात आले. ते पुधीलप्रमाणेः नाशिक - २.९६, पेठ - ०.७७, दिंडोरी-१.२५, सुरगाणा-१.९४, कळवण-१.०२, सटाणा - १.३६, मालेगाव - २.१८, चांदवड - १.०८, नांदगाव - १.२, येवला -१.१६, निफ़ाड - १.५६, सिन्नर - १.३१, इगतपुरी - १.१२, त्र्यंबकेश्वर - ०.९१, देवळा -०.८४.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Govt. College of Arts & Science Aurangabad.

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.

**आदिवासींची लोकसंख्या:**

नाशिक जिल्ह्यातील अदिवासींची लोकसंख्या अभ्यासण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी जनगणना १९७१ पासून ते २०११ पर्यंतच्या आकडेवारीचा विचार करण्यात आला आहे. तक्ता क्र. १ मध्ये याच लोकसंख्येचा तालुकानिहाय तपशील देण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातील एकूण १५ तालुक्यांमध्ये कमी जास्त प्रमाणात आदिवासी लोकसंख्या वास्तव्य करीत आहे. तक्ता ३.१ वरुन असे निदर्शनास येते की, काही तालुक्यांमध्ये मात्र एकूण लोकसंख्येशी प्रमाण अभ्यासल्यानंतर आदिवासींचे प्रमाण जास्त निदर्शनास येते. नाशिक जिल्ह्यातील १९७१ ते २०११ या पन्नास वर्षाच्या कालावधीत नाशिक तालुक्यामध्ये असलेली आदिवासी लोकसंख्या ही घटत असल्याचे निदर्शनास येते. सर्वात जास्त आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण सुरगाणा तालुक्यात असून ते २०११ मध्ये ९६.५१ टक्के इतके होते.

तक्ता क्र.२

**नाशिक जिल्ह्यातील आदिवासींची जनगणनानिहाय लोकसंख्या (टक्केवारीत)**

| अ. न. | तालुके | लोकसंख्या (टक्केवारीत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1971 | 1981 | 1991 | 2001 | 2011 |
| १ | नाशिक | १३.४१ | १३.०५ | १३.११ | ०९.९५ | १०.४२ |
| २ | पेठ | ९५.१२ | ९३.६७ | ९४.९४ | ९२.९२ | ९६.४४ |
| ३ | दिंडोरी | ४७.४४ | ४९.२७ | ५१.९३ | ५२.५२ | ५५.५७ |
| ४ | सुरगाणा | ९५.७१ | ९१.७७ | ९५.७७ | ९४.८१ | ९६.५१ |
| ५ | कळवण | ४८.३८ | ४९.४५ | ५१.८९ | ६५.८९ | ६८.९५ |
| ६ | सटाणा (बागलाण) | २२.४४ | २९.८४ | ३१.२७ | ३४.४५ | ४०.०२ |
| ७ | मालेगाव | ०८.४५ | ०८.७१ | ०८.१९ | ०८.३३ | १०.१५ |
| ८ | चांदवड | १३.६७ | १३.९५ | १५.७४ | १८.०१ | १९.५९ |
| ९ | नांदगाव | १०.९६ | १०.२९ | १०.९७ | ११.४२ | १५.२७ |
| १० | येवला | ०५.८४ | ०६.८१ | ०८.१० | ०९.०८ | १०.७२ |
| ११ | निफाड | १३.८२ | १४.९२ | १६.१३ | १८.१३ | १९.४२ |
| १२ | सिन्नर | १०.९७ | १०.०८ | ११.४१ | १२.१४ | १३.३५ |
| १३ | इगतपुरी | ३७.९६ | ३९.८१ | ४०.१७ | ३७.८५ | ४०.४७ |
| १४ | त्र्यंबकेश्वर | - | - | - | २२.२० | ८०.२० |
| १५ | देवळा | - | - | - | १७.१४ | २०.८४ |
| | एकूण | २३.२६ | २३.४५ | २४.१७ | २३.९२ | २५.६२ |

स्त्रोत : जनगणना अहवाल, १९७१ ते २०११

टीप - १९९१ पर्यंत देवळा व त्र्यंबकेश्वर स्वतंत्र तालुके निर्माण झालेले नव्हते.

सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या मालेगाव तालुक्यात असून २०११ मध्ये ते १०.१५ टक्के इतके असल्याचे निदर्शनास येते. १९७१ मध्ये जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या २३.२६ टक्के लोकसंख्या आदिवासी जमातीची असल्याचे दिसते. सर्वात जास्त लोकसंख्या सुरगाणा तालुक्यात असून ९५.७१ टक्के इतके प्रमाण आहे.

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Asst. Prof.
M.E.S.Class-I
Govt.College of Arts
Science A'bad.

पेठ या तालुक्यात ९५.१२ टक्के इतके आदिवासी जमातींचे प्रमाण असल्याचे निदर्शनास येते. या नंतर कळवण, दिंडोरी या तालुक्यांमध्ये आदिवासी जमातीची लोकसंख्या जास्त असल्याचे दिसते. येथे अनुक्रमे ४८.३८ टक्के व ४७.४४ टक्के इतके आहे. ५ ते १० टक्क्यांच्या दरम्यान मालेगाव, येवला या तालुक्यात आदिवासी लोकसंख्या असल्याचे दिसते. तर १०ते ४० टक्क्यांच्या दरम्यान नाशिक, बागलाण,(सटाणा), चांदवड, नांदगाव, निफाड, सिन्नर, इगतपुरी या तालुक्यामध्ये असलेली दृष्टीपथास येते.

१९८१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या २३.४५ टक्के लोकसंख्या आदिवासी असल्याचे निदर्शनास येते. १९७१ ते १९८१ या जनगणना वर्षात केवळ ०.१९ टक्के इतकी आदिवासी लोकसंख्या वाढलेली आहे. तसेच या कालावधीत पेठ, सुरगाणा या तालुक्यात आदिवासी लोकसंख्या सर्वाधिक असून ती अनुक्रमे ९३.६७ टक्के व ९१.७७ टक्के इतकी होती. तदनंतर दिंडोरी व कळवण या तालुक्यात आदिवासी लोकसंख्या जवळ-जवळ एकूण लोकसंख्येच्या निम्मी असल्याचे दिसते. नाशिक तालुक्यात तुलनेने लोकसंख्येत घट झाल्याचे दिसते. तसेच सिन्नर याही तालुक्यात आदिवासी लोकसंख्येत घट झालेली आहे. एकंदरीत उर्वरित तालुक्यात लोकसंख्येत वाढ होत असल्याचे दिसते.

१९९१ च्या जनगनणेनुसार आदिवासींची एकूण टक्केवारी २४.१७ टक्के इतकी होती. तुलनेने मागील जनगणनावर्षात ०.७२ टक्के इतकी वाढ झालेली आहे. या कालावधीत पेठ, सुरगाणा हेच तालुके आघाडीवर असून पेठच्या तुलनेत सुरगाणा या तालुक्यातील आदिवासी लोकसंख्या जास्त वाढलेली आहे. तसेच १९८१ च्या तुलनेत मालेगाव वगळता सर्वच तालुक्यामध्ये लोकसंख्या वाढ झालेली आहे. २००१ च्या जनगणनेनुसार एकूण आदिवासी जमातीची एकूण लोकसंख्या २३.९२ टक्के इतकी असून दहा वर्षाच्या जनगणना कालावधीत ०.२५ टक्क्याने घट झालेली आहे. ही लोकसंख्या घट नाशिक, पेठ, सुरगाणा व इगतपुरी या तालुक्यांमध्ये झालेली आहे. परंतु कळवण, सटाणा (बागलाण), चांदवड, निफाड, सिन्नर या तालुक्यांमध्ये लोकसंख्येत वाढ झालेली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण आदिवासी जमातीची लोकसंख्या २५.६२ टक्के इतकी असून २००१ च्या तुलनेने १.७ टक्के ने आदिवासी जमातीच्या लोकसंख्येत वाढ झालेली आहे. सर्वात जास्त आदिवासी लोकसंख्या सुरगाणा तालुक्यात असून ते ९६.५१ टक्के इतके आहे. तर त्यानंतर पेठ तालुक्यात प्रमाण जास्त असून ते ९६.४४ टक्के इतके आहे. त्यानंतर कळवण, सटाणा (बागलाण), त्र्यंबकेश्वर या तालुक्यांमध्ये प्रमाण जास्त आहे. त्र्यंबकेश्वर तालुका नव्याने निर्माण केल्यामुळे २००१ च्या तुलनेने २०११ मध्ये आदिवासी लोकसंख्या जास्त असल्याचे निदर्शनास येते उर्वरित तालुक्यांमध्येही या कालावधीत आदिवासी लोकसंख्येत वाढ झालेली आहे.

१९७१ ते २०११ या कालावधीतील आदिवासी जमातीची सरासरी टक्केवारी अभ्यासल्यानंतर असे निदर्शनास येते की, पेठ, सुरगाणा ह्या तालुक्यांची सरासरी ९० टक्के पेक्षा जास्त आहे. कळवण, दिंडोरी अशा तालुक्यांमध्ये ३५ ते ५० टक्के आदिवासी बांधव राहत असून त्यांच्या दैनंदिन जीवनावर भौगोलिक, सामाजिक, आर्थिक घटकांचा सतत परिणाम होत असल्याने यांची जीवनगाथा अतिशय संघर्षमय आहे. रुधी, परंपरा प्रभाव या भागातील लोकांवर असल्याने सतत दारिद्र्यात जीवन कंठावे लागत असल्याने त्यांना हंगामी स्थलातर करावे लागते. या भागात कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त असल्याने उत्पादन कमी, त्यामुळे ते पुरेसे होत नाही. म्हणून पिकांचा हंगाम संपला की नाशिक, पुणे, मुंबई तर काही गुजरात राज्यात स्थलांतर करतात.

**संदर्भ:**


१. काचोळे, दा.धो. (२००१): लोकसंख्याशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

२. खतीब, के.ए. (२०११): लोकसंख्या भूगोल, विद्या बुक्स, औरंगाबाद.

३. चव्हाण एन.एल (२००३), □भारतीय अर्थव्यवस्था□, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.

४. घारपुरे व्ही. टी. (२००५): लोकसंख्या भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

५. •नगणना अहवाल (२०११): भारत सरकार, दिल्ली.


Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Asst. Prof.
M.E.S.Class-I
Govt.College of Art's
Science A'bad.